# -:जाहीर अवाहन:-

राष्ट्रीय पशुधन अभियान ( National Livestock Mission ) सन-२०२०-२१ अंतर्गत वैरण बियाणे प्रापण , संकलन व वितरण या योजनेखाली उस्मानाबाद जिल्हयातील अनुसचीत जाती प्रवर्गातील पशुपालक शेतक-यांना सुधारीत जातीच्या चारा पिकांच्या बियाण्याचे आणि बहुवार्षिक चारा पिकांच्या ठोंबाचे वाटप १००% अनुदानावर करावयाचे आहे. प्रति १० गुंठे ( १० आर ) जमीनीच्या क्षेत्रासाठी सदरील चारा पिकांच्या बियाण्याचे आणि ठोंबाचे वाटप सर्वसाधारण प्रवर्गातील पशुपालक शेतक-यांना करण्यात येत आहे . १० गुंठे क्षेत्रासाठी बारामाही सिंचनाची सुविधा असलेल्या पशुपालकांना बहुवार्षिक चारा पिकांच्या ठोंबाचे वाटप करावयाचे आहे.

तरी ईच्छूक लाभार्थीनी अर्जाच्या स्वरूपातील प्रस्ताव नजीकच्या पशुवैधकीय दवाखान्यामार्फत संबधीत तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी ( विस्तार ) पंचायत समिती यांच्याकडे दिं. ११ जानेवारी-२१ ते दि. १० फेब्रुवारी-२१ पर्यंतच्या कालावधीत सादर करावे असे अवाहन करण्यात येत आहे . अर्जाचा नमुना आणि सोबत जोडावयाची कागदपत्रे , अटी व शर्ती याबाबतचा तपशील लाभार्थीशी निगडीत असलेल्या नजीकच्या पशुवैधकीय दवाखान्यात व संबधीत तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी ( विस्तार ) पंचायत समिती यांच्याकडे उपलब्ध आहे.

तरी अधिकच्या माहितीसाठी संबधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी विस्तार व नजीकच्या पशुवैधकीय संस्थेचे संस्थाप्रमुख यांच्याशी संपर्क साधावा. सदरील योजनेचा अनुसचीत जाती प्रवर्गातील पशुपालक/शेतकरी या लाभार्थीनी जास्तीजास्त प्रमाणात लाभ घेण्याबाबतचे अवाहन करण्यात येत आहे.

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**उस्मानाबाद**